**नगर परिषद मलकापूर जि.बुलढाणा**

**दि.011/3/2022 प्रशासकीय सभेचे कार्यवृत्त**

**1.पाणी पुरवठा विभागाच्या सन 2022-23 या वर्षाकरिता ब्लीचिंग पावडर,तुरटी,पीएसी पावडर खरेदी,हातपंप साहित्य खरेदी करणे लिकेज दुरुस्ती साहित्य खरेदी करणे,पाणी पुरवठा विभागातील लिकेज दुरुस्तीचे व इतर कामे कंत्राटी पध्दतीने करण्याकरिता अकुशल व कुशल मजुराचा पुरवठा करण्याबाबत तसेच पाणी पुरवठा विभागातील किरकोळ कामे शासकीय दरसूची (मजिप्रा,सार्वजनिक बांधकाम विभाग,भूजल सर्वेक्षण विभाग,इलेक्ट्रीक व यात्रिकी,swm,होर्टीकलचर) नुसार करण्याबाबत मान्यता देणे.**

पाणी पुरवठा विभागाच्या सन 2022-23 या वर्षाकरिता ब्लीचिंग पावडर,तुरटी,पीएसी पावडर खरेदी,हातपंप साहित्य खरेदी करणे लिकेज दुरुस्ती साहित्य खरेदी करणे,पाणी पुरवठा विभागातील लिकेज दुरुस्तीचे व इतर कामे कंत्राटी पध्दतीने करण्याकरिता अकुशल व कुशल मजुराचा पुरवठा करण्याबाबत तसेच पाणी पुरवठा विभागातील किरकोळ कामे शासकीय दरसूची (मजिप्रा,सार्वजनिक बांधकाम विभाग,भूजल सर्वेक्षण विभाग,इलेक्ट्रीक व यात्रिकी,swm,होर्टीकलचर) नुसार करण्याबाबत मान्यता देणेबाबत ची टिप्पणी पाणी पुरवठा अभियंता,लेखापाल,मुख्याधिकारी यांनी टिप्पणी सादर केली त्यानुसार सन 2022-23 करिता खालील कामांना मान्यता देणे आवश्यक आहे.

**क.ब्लिचींग पावडर खरेदी करणे**-पाणी विभागात ब्लिचींग पावडर पाणी शुध्दीकरण प्रक्रियेत 33-34 टक्के क्लोरीन असलेली ब्लिचिंग पावडर बंधनकारक असून 2022-23 या वर्षाकरिता एकुण 1200 बॅग ब्लिचींग पावडर लागण्याची शक्यता आहे.या करिता अर्थसंकल्पता तरतूद करण्यात आली आहे.सदर खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करुन अथवा नविन शासकीय खरेदी धोरण दि.7 मे 2021 नुसार बाजार दर मार्गविणे गरजे आहे.

**ख.तुरटी खरेदी करणे**- मलकापूर शहरास पाणी उदभव स्थळ पूर्णा नदी बँक वॉटर असून पाणी बारमाही गाळयुक्त राहत असून पावसाळयाचे दिवसात जास्त प्रमाणात तुरटीचा वापर करुन पाण्याचा गढुळपणा कमी करावा लागतो.योग्य दर्जाची 15 टक्के ते 16 टक्के soluble Aluminim Matterअसलेली तुरटी एकुण 200 टन तुरटी/पीएसी पावडर 500 बॅग लागण्याची शक्यता असून अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली आहे.

**ग.जलशुध्दीकरण केंद्र विदयुत देखभाल व दुरुस्ती करणे**- मलकापूर जलशुध्दीकरण केंद्रात 50 अश्वशक्तीचे दोन सेंट्रीफ्युगल पंप (28हेडमी 325000 प्रति तास क्षमता) 40 अश्वशक्ती 2 पंप,ब्लोवर पंप दोन नळगंगा हेडवर्क 30 अश्वशक्तीचे 1 व्हिटी पंप 200 KVA रोहीत दोन जलशुध्दीकरण एक्सप्रेस फीडर युनिटी,ड्रेनेज पंप 5 अश्वशक्तीचे व पाणबुडी 10 अश्वशक्ती 3 व्ही.टी.पंप फलँश मिक्सर मोटार दुरुस्ती करणे,ब्रिज मोटार दुरुस्ती करणे,मडपंप दुरुस्ती करणे इत्यादी विदयुत दाबावर चालणारे उपकरणे असून ही सर्व चालवणारा वर्ग-4 अतांत्रिक कर्मचारी असून दैनंदिन जलशुध्दीकरण केंद्रात लग्स बदलविणे,लोड तपासणे,फेज बदलविणे वगैरे दररोज कामे करावी लागतात न.प.कडे सदर देखभाल दुरुस्ती करिता तांत्रिक कर्मचारी बाहेरील मक्तेदाराकडून वर्षभर देखभाल दुरुस्ती केली जाते.नविन योजनेवरील वाढलेली उपांगे लक्षात घेता म.जी.प्रा.दरसूचीनुसार मधील वार्षीक रु आट लक्ष खर्च अपेक्षित आहे.त्यासाठी वर्तमानपत्रात ई'निविदा अथवा नविन शासकीय खरेदी धोरण दिनाक 7 मे 2021 नुसार बाजार दर मागविणे गरजेचे आहे.

**घ.धुपेश्वर येथील 100/150 अश्वशक्तीचे पंप दुरुस्ती साहित्य पुरवठा करणे**- न.प.पंपींग स्टेशन येथे नविन योजनेवरील 100 अश्वशक्तीचे 3 नविन पंप असून जुन्या योजनेवरील 150 अश्वशक्तीचे 1 पंपसुध्दा वापरात आहे.तसेच नळगंगा हेडवर्क येथे 30 अश्वशक्तीचे पंप आहे.उपरोक्त पंप जास्त क्षमतेचे असून न.प.कडे उपरोक्त पंप दुरुस्तीसाठी तांत्रिक कर्मचारी नसल्यामुळे बऱ्याचदा पंप जळाल्यामुळे शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत होतो.सन 2022-23 मध्ये उपरोक्त दुरुस्तीसाठी वार्षीक अंदाजे 8 लक्ष खर्च अपेक्षित आहे.त्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात काढून ई निविदा/निविदा बाजार भावाने दरपत्रक मार्गविणे गरजेचे आहे.

कर्मचारी कंत्राट पध्दतीने घ्यावे लागेल पाणी पुरवठा विभागात गरजू बाहय अभिकर्ता मार्फत कर्मचारी भरती करुन त्यांना प्रशिक्षित करण्यात यावे अथवा इतर विभागातील कर्मचारी तात्पुरता स्वरुपात पाणी पुरवठा विभागात वळती करावे लागतील जलशुध्दीकरण केंद्र चालविण्यास व शहरात वितरण व्यवस्थेतील खोदकाम करण्यासाठी शासकीय गरजेदारी कर्मचारी नियमानुसार सदरभरती करण्यास अथवा मंजूर लावण्यास खोदकाम करणे इ कामे कंत्राट पध्दतीने करण्यास येणाऱ्या खर्च अपेक्षित आहे.

**ब पाणी पुरवठा विभागातील किरकोळ कामे शासकीय दरसूची(मजिप्रा.सार्वजनिक बांधकाम विभाग.भूजल सर्वेक्षणा विभाग .इलेक्ट्रीक व यांत्रिकी, swm,होटीकलचर) नुसार करण्याबाबत निर्णय घेणे**- पाणी पुरवठा विभागात बऱ्याच वेळा छोटया स्वरुपात पाईपलाईन टाकणे,जेसीबी लावणे,चेंबर बांधणे,किरकोळ दुरुस्त्या कराव्या लागत असून सदर कामासाठी मोठया प्रमाणात जाहिरातींचा खर्च होत असून किरकोळ कामाचे अंदाजपत्रक बनविणे व इतर कामासाठी प्रशासनाचा मोठा वेळ जात असून सदर कामासाठी शासकीय दरसूची(मजिप्रा.सार्वजनिक बांधकाम विभाग.भूजल सर्वेक्षणा विभाग .इलेक्ट्रीक व यांत्रिकी, swm,होटीकलचर)नुसार काम करण्यासाठी वार्षीक मक्तेदार नेमणूक केल्यास मोठया प्रमाणात आर्थीक बचत होऊ शकते व किरकोळ कामांचे व चांगले नियोजन होऊ शकते तरी किरकोळ कामांसाठी प्रचलित दरसूचीने काम करणारा मक्तेदार नेमणूक करणे योग्य राहिल.असे तसेच सदरची कामे15 वा वित्त आयोग निधी (बंधानकारक अनुदान 50 टक्के पाणी पुरवठा राखीव निधी ,नगर परिषद निधी अंतर्गत इतर उपलब्ध शासकीय निधीतून करणे योग्य राहिल असे टिपणणीत नमूद केले आहे.

ठरविण्यात येते की, वरील सर्व बाबी विचारात घेता .पाणी पुरवठा विभागाच्या सन 2022-23 या वर्षाकरिता ब्लीचिंग पावडर,तुरटी,पीएसी पावडर खरेदी,हातपंप साहित्य खरेदी करणे लिकेज दुरुस्ती साहित्य खरेदी करणे.पाणी पुरवठा विभागातील लिकेज दुरुस्तीचे व इतर कामे कंत्राटी पध्दतीने करण्याकरिता अकुशल व कुशल मजुराचा पुरवठा करण्याबाबत तसेच पाणी पुरवठा विभागातील किरकोळ कामे शासकीय दरसूची (मजिप्रा.सार्वजनिक बांधकाम विभाग.भूजल सर्वेक्षण विभाग,इलेक्ट्रीक व यांत्रिकी,swm.होटीकलचर) नुसार करण्याकरिता कामांची वार्षीक ई निविदा-निविदा अथवा नविन शासकीय खरेदी धोरण दि.7 मे 2021 नुसार बाजार दर मागविण्यास तसेच सदरची कामे15 वा वित्त आयोग निधी (बंधानकारक अनुदान 50 टक्के पाणी पुरवठा राखीव निधी .नगर परिषद निधी अंतर्गत इतर उपलब्ध शासकीय निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**2.धुपेश्वर पंपींग स्टेशन येथील जॅकवेल (8मीटर व्यास, खोली 23 मीटर) दुरुस्ती करणेबाबत**

धुपेश्वर पंपींग स्टेशन येथील जॅकवेल (8मीटर व्यास,खोली 23 मीटर) ही जा.क्रं./तांशा/मलकापूरपापुयो/586/1987 दिनांक 6-4-1987 ला उपविभागीय अभियंता परिसर अभियांत्रिकी उप-विभाग खामगांव यांचे मार्फत देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.CPHEO MANUAL नुसार पंपींग स्टेशन चे आयुष्य 30 वर्षे एवढे आहे.नियमानुसार पंपींग स्टेशन आयुष्य 2015 रोजी संपलेले असून सदर जॅकवेल मोठया प्रमाणात क्षतिग्रस्त झाली असून ती केव्हाही पडू शकते .मलकापूर शहर नविन पाणी पुरवठा योजना प्रस्तावित असून त्यात 10 मीटर व्यासाची रु.13127900/-किमतीची जॅकवेल प्रस्तावित असून योजना मंजूर होण्यास बराच कालावधी लागू शकतो त्या दरम्यान जॅकवेल ढासळल्यास शहरातील पाणी पुरवठा कायम स्वरुपी विस्कळीत होऊन नगर पालिकेचे पंप,पॅनेल,यांची आर्थीक हानी तसेच जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.तरी सदर जॅकवेल दुरुस्ती करणे गरजेचे आहे.तरी सदर काम तातडीचे असल्यामुळे 15 वा वित्त आयोग/वैशिष्टयपूर्ण निधी/पाणी टंचाई निधी अथवा नगर पालिका निधीतून प्राधान्याने करणे गरजेचे आहे.असे पाणी पुरवठा अभियंता,लेखापाल,मुख्याधिकारी यांचे टिप्पणीत नमूद करण्यात आले आहे.

ठरविण्यात येते की,वरील सर्व बाबी विचारात घेता धुपेश्वर पंपींग स्टेशन येथील जॅकवेल (8मीटर व्यास, खोली 23 मीटर) दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक असल्याने सदरचे काम तातडीने 15 वा वित्त आयोग/वैशिष्टयपूर्ण निधी/पाणी

टंचाई निधी अथवा नगर पालिका निधीतून प्राधान्याने करण्यास तसेच आवश्यक ती निविदा प्रक्रिया करण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरात देत आहे.

**3.राठी ले आऊट भागातील रस्त्याच्या मधील 6 इंची पाईपलाईन जमिनीतून काढून रस्त्याच्या बाजूला शिफ्टींग करणेबाबत**

मलकापूर शहरात मोठया प्रमाणात रस्ता व नाली बांधकाम सुरु असून शहरातील वितरण व्यवस्था ही जुनी असून शहरातील बऱ्याच भागात वितरण व्यवस्था ही जुनी असून शहरातील बऱ्याच भागात वितरण पाईपलाईन ही रस्त्याच्या मध्य भागी अथवा खाजगी जागेतून गेलेली आहे रस्ता काम करताना अथवा देखभाल दुरुस्ती वेळी सदर बाब निदर्शनास येत असून राठी ले आऊट मध्ये सुध्दा श्री.अनिलदादा झोपे ते हनुमान नगर रोड पर्यंत नविन रस्ता काम सुरु असून कामा दरम्यान संबंधित मक्तेदार यांनी काम करताना पाईपलाईन रस्त्याच्या मधात येत असून ती शिफ्टींग करण्याबाबत दूरध्वनीने कळविले आहे.तरी स्थळ निरीक्षण केले असता 6इंची पाईपलाईन व इतर साहित्य जमिनीतून काढून बाजूला शिफ्टींग करणे योग्य होईल.तरी सदर काम तातडीचे असल्यामुळे 15 वा वित्त आयोग/वैशिष्टपूर्ण निधी,पाणी टंचाई निधी अथवा नगर पालिका निधीतून प्राध्यानाने करणे गरजेचे आहे असे पाणी पुरवठा अभियंता,लेखापाल,मुख्याधिकारी यांचे टिप्पणीत नमूद केले आहे.

ठरविण्यात येते की, वरील सर्व बाबी विचारात घेता राठी ले आऊट भागातील रस्त्याच्या मधील 6 इंची पाईपलाईन जमिनीतून काढून रस्त्याच्या बाजूला शिफ्टींग करणे अत्यंत गरजेचे आहे सदर काम तातडीचे असल्यामुळे 15 वा वित्त आयोग/वैशिष्टपूर्ण निधी,पाणी टंचाई निधी अथवा नगर पालिका निधीतून प्राध्यानाने करण्यास तसेच त्यासाटी आवश्यक ती निविदा प्रक्रिया करण्यास तसेच येणाऱ्यास खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

**4.पाणी पुरवठा विभागामार्फत श्री डॉल्फिन केमिकल,जळगांव यांचे मार्फत तातडीने खरेदी केलेल्या 200 बॅग ब्लिचींग पावडर खरेदी खर्चास मान्यता देण्याबाबत**

आर्थीक वर्ष 2020-21 करिता श्री बजाज केमिकल,वरोरा जिल्हा चंद्रपूर यांची वार्षीक पुरवठादार म्हणून नेमणूक झालेली असून सदर देयके त्यांचे मजूर दर हे प्रति बॅग रु.730/- एवढे मंजूर असून त्यांनी त्यांचे मोठया प्रमाणात नगर पालिका आर्थीक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे देयके थकीत असून त्यांनी त्यांना ब्लिचींग पावडर संपल्यामुळे देण्यात आलेला 200 बॅग पुरवठा आदेश क्रं.मनप/पापु/136/2022 दिनांक 16/1/2022 नुसार पुरवठा। आदेश दिला असता त्यांनी दिनांक 21/01/2022 पर्यंत कोणताही पुरवठा केला नसून त्या कालावधीत जलशुध्दीकरण प्रक्रिया खंडीत होऊ नये म्हणून पाणी पुरवठा विभागामार्फत 10 थैली ब्लिचिंग पावडर श्री सुरज मेडीकल,मलकापूर यांचे कडून रु.830/- दराने खरेदी करण्यात आले तरी संबंधितानी पुरवठा न केल्यामुळे त्यांना स्मरणपत्र मनप/पापु/180/2022 दिनांक 21/1/2022 ला देण्यात आले परंतु त्यांनी कोणताही पुरवठा न केल्यामुळे व बाजारातून खरेदी करण्यासाठी निविदा प्रक्रियेत जाणारा वेळ पाहता या पूर्वीचे मक्तेदार व निविदा प्रक्रियेत त्यांची तांत्रिक पात्रता पाहता त्यांची त्याच दराने बिल्चींग पावडर पुरवठा करण्याची तयारी असल्यामुळे मा.प्रशासक व मुख्याधिकारी यांच्या मान्यतेने त्यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला असून त्यांनी विहीत मुदतीत ब्लिचींग पुरवठा केला आहे.तरी सदर श्री डॉल्फिन केमिकल यांच्या व सुरज मेडिकल यांचे कडून खरेदी पोटी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी घेणे गरजेचे आहे असे पाणी पुरवठा अभियंता लेखापाल व मुख्याधिकारी यांच्या टिप्पणीत नमूद करण्यात आले आहे.

ठरविण्यात येते की,वरील सर्व बाबी विचारात घेता.पाणी पुरवठा विभागामार्फत श्री डॉल्फिन केमिकल,जळगांव यांचे मार्फत तातडीने खरेदी केलेल्या 200 बॅग ब्लिचींग पावडर खरेदी खर्चास तसेच श्री सुरज मेडीकल,यांचे कडून खरेदी पोटी झालेल्या खर्चास कार्योत्तर ही सभा मान्यता देत आहे.

**5नगर परिषद मलकापूर क्षेपण भूमीवर विधन विहीर व टाकी घेणेबाबत तसेच अनुषंगिक खर्चास मंजूरी देणेबाबत**

घनकचरा प्रक्रिया केंद्रावर प्रक्रिया तसेच तेथील कर्मचारी यांना स्वच्छतेच्या दृष्टीने मुबलक पाणी पुरवठा असणे गरजेचे असून मलकापूर नगरपालिका डीपीआर अंमलबजावणी अंतिम टप्प्यात असून घनकचरा व्यवस्थापन नियम

2016नुसार क्षेपण भूमीवर मुबलक पाणी पुरवठा असणे आवश्यक आहे.तरी भूजल सर्वेक्षण विभागामार्फत पाणी स्थळ निश्चिती करुन घेण्यात येवून भूजल सर्वेक्षण विभागाची दरसूची वापर करुन अंदाजपत्रक तयार करुन घेणे योग्य राहिल.

सदर काम विहीत मुदतीत करणे गरजेचे आहे.तरी सदर काम तातडीचे असल्यामुळे 15 व्या वित्त आयोग/वैशिष्टयपूर्ण निधी/पाणी टंचाई निधी डीपीआर निधी/प्रोत्साहन अनुदान अथवा नगर पलिका निधीतून प्राधान्याने करणे गरजेचे आहे. असे पाणी पुरवठा अभियंता,लेखापाल,मुख्याधिकारी यांचे टिप्पणीत नमूद केले आहे.या वर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,वरील सर्व बाबी विचारात घेतानगर परिषद मलकापूर क्षेपण भूमीवर विंधन विहीर व टाकी घेणेबाबत तसेच अनुषंगिक खर्चास मंजूरी आवश्यक असल्याने सदरची कामे करण्यास तसेच सदर काम तातडीचे असल्यामुळे 15 व्या वित्त आयोग/वैशिष्टयपूर्ण निधी/पाणी टंचाई निधी डीपीआर निधी/प्रोत्साहन अनुदान अथवा नगर पलिका निधीतून प्राधान्याने करण्यास व येणाऱ्या खर्चास व त्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

**6.विदयुत बिलात बचत करण्यासाठी धुपेश्वर पंपीग स्टेशन वजलशुध्दीकरण केंद्रातीलल पॉवर फॅक्टर सुधारण्याबाबत.**

सध्या धुपेश्वर पंपीग स्टेशन येथील देयका मध्ये सरासरी पॉवर फॅक्टर 0.726 येत असून तो कमी असल्यामुळे नगर पालिकेला विद्युत देयकात पॉवर फॅक्टर दंड आकारणीने देयके प्राप्त होत असून त्यानुसार धुपेश्वर पंपीग स्टेशन येथे पॉवर फॅक्टर मध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे.पॉवर फॅक्टर कमी झाल्यास वोल्टेज मध्ये घट होऊन लोड उपकरणे जास्त प्रमाणात करंट घेतात जास्त करंटमुळे मीटर रिडींग वाढून जास्त देयके प्राप्त होतात.त्यासाठी पॉवर फॅक्टर नियंत्रीत केल्यास व्होल्टेज कमी जास्त न होता स्थिर राहतो व उपकरणे कमी प्रमाणात करंट घेतात व देयकात बचत होते.पॉवर फॅक्टर सुधाण्यासाठी योग्य क्षमतेचे कॅपसिटर लावावे लागेल काही विद्युत बदल करावे लागतील.धुपेश्वर येथील देयकात 20,000/- प्रति माह विद्युत बिलात बचत होऊ शकते तसच व जलशुध्दीकरण केंद्रावर अद्याप देयकात दंडनीय आकारणी होत नाही आहे परंतु तेथेही भविष्यातील नियोजनाकरिता पॉवर फॅक्टर मध्ये सुधारणा करण्यात यावी.सदर काम तातडीचे असल्यामुळे 15 वा वित्त आयोग/वैशिष्टयपूर्ण निधी /पाणी टंचाई निधी अथवा नगर पालिका निधीतून प्राधान्याने करणे गरजेचे आहे.असे पाणी पुरवठा अभियंता,लेखापाल मुख्याधिकारी यांचे टिप्पणीत नमूद केले आहे यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की,वरील सर्व बाबी विचारात घेता.विदयुत बिलात बचत करण्यासाठी धुपेश्वर पंपीग स्टेशन व जलशुध्दीकरण केंद्रातीलल पॉवर फॅक्टर सुधारणा करणे गरजेचे असून ते केल्यामुळे मोठया प्रमाणात विदयुत बिलातत बचत होणार असल्याने सदरचे काम तातडीचे असल्यामुळे 15 वा वित्त आयोग/वैशिष्टयपूर्णा निधी /पाणी टंचाई निधी अथवा नगर पालिका निधीतून प्राधान्याने करण्यास व या करिता येणाऱ्या खर्चास व त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

**7.पाणी पुरवठा विभागातील आर्थीक वर्ष 2022-23 या कालावधीतील निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वार्षीक मक्तेदार यांना मुदतवाढ देणेबाबत**

दिनांक 31/3/2022 रोजी बऱ्याच वार्षीक निविदा करार संपुष्टात येत असून नविन मक्तेदार नियुक्ती प्रक्रिया पाणी पुरवठा विभागामार्फत त्यापूर्वी राबविण्यात येणार असून या पूर्वीचा अनुभव पाहता बऱ्याच कामासाठी 3ते4 वेळा प्रसिध्दी देऊन सुध्दा पुरवठादार प्राप्त होत नसून त्यामुळे दैनंदिन कामावर परिणाम होत असून जुन्या मक्तेदार यांना कार्योत्तर मंजूरी अथवा मा.अध्यक्ष/प्रशासक यांचे तातडीचे 58(2)अधिकार वापरुन मुदतवाढ द्यावी लागते व नंतर कार्योत्तर मंजूरी प्रस्ताव सभेसमोर ठेवावा लागतो. तरी ज्या कामासाठी मक्तेदार प्राप्त होणार नाही त्यांना अत्यावश्यक सेवा विस्कळीत होऊ नये म्हणून नविन मक्तदार नियुक्त होई पर्यंत मुदतवाढ देणे योग्य राहिल अशी टिप्पणी पाणी पुरवठा अभियंता,लेखापाल,मुख्याधिकारी यांनी त्यांचे टिप्पणीत नमूद केले आहे.या वर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**ड.मलकापूर ते धोपेश्वर नविन उध्ववाहिनी कायनेटीक गेअर एअर व्हॉल स्कर व्हॉल देखभाल दुरुस्ती करणे.** मलकापूर ते धोपेश्वर नविन उध्ववाहीने 30 एअर व्हॉल असून सदर एअर व्हॉल गुराखी व ग्रामीण भागातील नागरिक पाण्यासाठी नेहमी फोडत असतात त्यामुळे मोठया प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत असून त्यामुळे जलवाहिनी वरील दाब कमी जास्त होऊन नुकनास होण्याची शक्यता नाकारता येत नाही. न.प.ने त्या रस्त्यावर सुरक्षा गार्ड नेमण्यस कळविले आहे या एयर व्हॉल पैकी सदर रस्त्याने जड वाहने जात असल्यामुळे वेळीच दुरुस्त नाही केली तर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.मलकापूर ते धोपेश्वर अंतर 15 कि.मी.असल्याने 24 तास कर्मचाऱ्यास निगा राखणे शक्य नसल्यामुळे व पाणी पुरवठा विभागात कर्मचारी संख्या कमी असल्यामुळे मलकापूर ते धोपेश्वर गस्त घालून एयर व्हॉल देखभाल दुरुस्ती खाजगी पध्दतीने करणे आवश्यक आहे.तरी उपरोक्त दुरुस्तीसाठी वार्षीक 5 लक्ष खर्च अपेक्षित आहे.सध्या मलकापूर ते धोपेश्वर रायजींग मेनला योजना कार्यान्वीत 2018 पासून आजपर्यंत कोणतीही गळती नसून फक्त एयर व्हॉल लिकेज असतात त्यासाठी वर्तमानपत्रात ईनिविदा-निविदा नविन शासकीय खरेदी धोरण दिनांक 7 मे 2021 नुसार बाजार दर मार्गविणे गरजेचे आहे.

**च.पाणी पुरवठा विभागातील इंजिनअरींग कामे खाजगी वर्कशॉपवर करणे-** शहरातील वितरण व्यवस्थेतील वेगवेगळया आकाराचे एकूण 280 व्हॉल कमी नेहमी दुरुस्त करावे लागतात न.प.मनुष्यबळ कमी असून खोदकाम मजूर नसल्यामुळे बाहेरील व्यक्तीकडून भाडेतत्वावर खोदकाम करुन घ्यावे लागते.सदर कामे करिता असतांना तसेच इतर व्हॉल काम इंजिनिअरींग वर्कशॉपवर आकाराचे कडे वेल्डींग,ग्लँड,टनींग पंप शॉफ्ट गाळा भरणे,हातपंप वेल्डींग करणे इतर कामाकरिता दुरुस्तीसाठी वार्षीक 5 लक्ष अपेक्षित आहे.त्यासाठी वर्तमान पत्रात ईनिविदा -निविदा अथवा नविन शासकीय खरेदी धोरण दिनांक 7 मे 2021 नुसार बाजार दर मार्गविणे गरजेचे आहे.

**छ.मलकापूर शहरातील हातपंप साहित्य पुरवठा करणे व मजूर पुरवठा करणे-** मलकापूर शहरात एकूण विविध योजनेतून घेतलेले 100 हातपंप असून त्यापैकी 80 चालू स्थितीत असून इतर ठिकाणी भुगर्भात पाणी नसल्यामुळे पावसाळयात वगळून इतर वेळेस ते बंद असतात सदर हातपंप दुरुस्ती न.प.पथक करीत असून बाहेरील मक्तेदाराकडून साहित्य पुरवठा केला जाते व इतर वेल्डींग किरकोळ काम हातपंप दुरुस्ती व हातपंप प्रमुख वर्कशॉपवर करुन घेत असतात उपरोक्त दुरुस्तीसाठी 3.5 लक्ष व कर्मचारी खर्च 12 लक्ष साहित्यासाठी 7 लक्ष अपेक्षित आहे.पाणीपुरवठा विभागात हात पंप दुरुस्ती कर्मचारी सेवानिवृत्त होत असल्यामुळे सदर काम मजूरासह टेका पध्दतीने करुन घ्यावे लागेल त्यासाठी 1 फिटर 4 सहाय्यक कर्मचारी अशा एकूण 5 कर्मचाऱ्यांची गरज आहे.सदर कर्मचारी पुरविणेसाठी अभिकर्ता नेमणूक करावी लागेल व देयक म.जी.प्रा.दरसूचीनुसार अदा करावे लागेल त्यासाठी वर्तमान पत्रात ई निविदा -निविदा अथवा नविन शासकीय दरपत्रक धोरण नुसार बाजार दर मार्गविणे गरजेचे आहे.

**ज.पाणी पुरवठा विभागात 3 जलशुध्दीकरण केंद्र (4MLD,4.8MLD,4.5MLD) चालविणे व शहरातील वितरण व्यवस्थेतील खोदकाम करण्यासाठी मजूर लावून खोदकाम करणे व्हॉलमन व पंपचालक लावणे इ.कामे कंत्राटी पध्दतीने करणे-** पाणी पुरवठा विभागात भविष्यात मोठया प्रमाणात कर्मचारी सेवा निवृत्त होत असून त्यांचे जागी शासना मार्फत नविन भरती एकही कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे इतर सर्व कर्मचारी अतिरिक्त कामे करीत असून जलशुध्दीकरण केंद्र व धोपेश्वर येथे कार्यरत कर्मचारी यांना रिलीवर उपलब्ध नसल्यामुळे सदर कर्मचारी यांना सुटया देणे शक्य होत नाही.कर्मचारी यांना रिलीवर उपलब्ध नसल्यामुळे कर्मचाऱ्यास एकटे कर्तव्य बजावे लागते.सध्या पाणी पुरवठा आस्थापनावर नियुक्ती कर्मचारी इतर विभागात गरजेनुसार काम करीत आहे .त्यांचा जागी मागणीप्रमाणे खोदकाम दर दयावे लागत आहे.लिकेज कामाची माहिती असलेले फिटर पद व सहाय्यक पद तसेच लिपीक पाणी पुरवठा विभागात नसल्यामुळे पाणी पुरठा अभियंताला दैनंदिन कार्यालयीन कामे सोडून लिकेज जागी पूर्ण दिवस हजर राहावे लागते.वर्ष 2022 मध्ये पाणी पुरवठा विभागात दोन नविन उंच टाक्या कार्यान्वीत होत असून **4.5MLD** क्षमता नविन

जलशुध्दीकरण केंद्र तयार होत असल्यामुळे त्याचेसाठी अतिरिक्त मनुष्यबळ लागेल वस्तुस्थिती लक्षात घेता भविष्यात शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत न होण्यासाठी पाणी पुरवठा विभागात म.जी.प्रा.दरसूचीने मंजूर दरानुसार गरजू

ठरविण्यात येते की, वरील सर्व बाबी विचारात घेता पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेत येत निविदा प्रक्रिया पर्यंत काम करणे थांबविता येत नसल्याने पाणी पुरवठा विभागातील आर्थीक वर्ष 2022-23 या कालावधीतील निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वार्षीक मक्तेदार यांना गरजेनुसार मुदतवाढ देण्यास ही सभा । मंजुरात देत आहे.

(आर यु वेरडकर)

प्रशासक,

नगर परिषद,मलकापूर